॥ श्री नवनाथभक्तिसार ॥

Shri Navnath Bhaktisar

ADHYAYA 3 --- TRITEEYODHYAYA

श्रीगणेशाय नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीपांडुरंगाय नमः । श्रीकुलदेवतायै नमः । श्रीमातापितृभ्यां नमः ।

Shri Ganeshaaya Namah | Shri Gurubhyo Namah | Shri Paandurangaaya Namah | Shri Kuladevataayai Namah | Shri Maataa pitribhyaam Namah |

Summary

*Chapter 3 While on a pilgrimage, **Machchindranath** travels south to Setubandh Rameshwar, where he encounters **Hanuman** (Maruti). When heavy rain begins to fall, Hanuman hastily starts digging a makeshift cave into a cliffside for shelter. Amused, Machchindra mocks him, calling him a foolish monkey for preparing a house after the storm has already arrived. Deeply offended by the insult, a furious Hanuman unleashes his gigantic, terrifying cosmic form and hurls dozens of massive mountains through the sky at the yogi.*

*Unmoved, Machchindra uses his advanced Vayu (wind) and Sabari mantra powers to freeze the flying mountains mid-air and gently bounce them away like children's toys. Realising that this ascetic is no ordinary human but the divine incarnation of Kavi Narayan, a humbled Hanuman stops the battle and bows in deep reverence. Hanuman then reminds Machchindra of his ultimate earthly duty: he must travel directly to the forbidden **Kingdom of Women** (Stree-Rajya) to wed its queen and fulfill a grand, pre-ordained cosmic destiny.*

Ovee 1

जयजयाजी पंढरीशा । रुक्मिणीवरा आदिपुरुषा । पुंडलिकवरदा पुंडरीकाक्षा । सर्वसाक्षी जाणता तूं ॥ १ ॥

Transliteration

Jaya jaya ji Pandhareeshaa | Rukminee-varaa Aadipurushaa | Pundalika-varadaa Pundareekaakshaa | Sarvasaakshee jaanataa too ||

Ovee 2

हे जगत्पालका जगन्नायका । ब्रम्हांडावरी यादवकुळटिळका । आतां भक्तिसारीं दीपिका । ग्रंथार्थदृष्टी मिरवावी ॥ २ ॥

Transliteration

Hey Jagat-paalakaa Jagannaayakaa | Brahmaandaa varee Yaadava-kula-tilakaa | Aataa bhakti-saaree deepikaa | Grantha-artha drishtee miravaavee ||

Ovee 3

मागिले अध्यायीं सिद्धसाधन । श्रीमच्छिंद्र नाथा आलें वडोन । उपरांतिक भस्मदान । सरस्वतीतें तेणे केलें ॥ ३ ॥

Transliteration

Maagile adhyaayee siddha saadhanu | Shree Machchindra Naathaa aale vadonu | Uparaantika bhasma daanu | Sarasvateete tene kele ||

Ovee 4

केलें परी दैवहत । तिनें टाकिंले गोमहींत । परी फार ठकली अदैववंत । अतिहीन प्रारब्धीं ॥ ४ ॥

Transliteration

Kele paree daivahatu | Tine taakile gomaheentu | Paree phaara thakalee adaivavantu | Atiheena praarabdhee ||

Ovee 5

घर पुसत लाभ आला । तो निर्दैवपणें पदीं लोटिला । कीं पुढें मांदुस येतां वहिला । अंध होय आवडीनें ॥ ५ ॥

Transliteration

Ghara pusata laabha aalaa | Toh nirdaiva pane padee lotilaa | Kee pudhe maandusa yetaa vahilaa | Andha hoya aavadeene ||

Ovee 6

कीं अवचट लाधला चिंतामणी । तो आवडी गोवी गोफणी । कीं खडा म्हणोनि देतो झोकोनी । कृषिशेतीं टाकीतसे ॥ ६ ॥

Transliteration

Kee avachata laadhalaa chintaa manee | Toh aavadee govee gophanee | Kee khadaa mhanoni deto jhokonee | Krishi shetee taakeetase ||

Ovee 7

कीं अवचट लाधतां पीयूषवट । विष म्हणोनि करी वीट । तेवीं विप्रजाया अदैवें पाठ । नाडलीसे सर्वस्वें ॥ ७ ॥

Transliteration

Kee avachata laadhataa peeyoosha vatu | Visha mhanoni karee veetu | Tevee vipra-jaayaa adaive paathu | Naadaleese sarvasve ||

Ovee 8

सहज काननीं फिरतां फिरतां । जाऊनि बैसे कल्पतरुखालता । परी दैवइच्छे भूत खाईल आतां । तन्न्यायें नाडली ॥ ८ ॥

Transliteration

Sahaja kaananee phirataa phirataa | Jaauuni baise kalpataru khaalataa | Paree daivaichche bhoota khaaeela aataa | Tannyaaye naadalee ||

Ovee 9

कीं कामधेनु गृहीं आली । ती बाहेर बळेंचि दवडिली । तन्न्यायें परी झाली । नाडलीसे सर्वस्वें ॥ ९ ॥

Transliteration

Kee Kaama dhenu grihee aalee | Tee baahera balenchi davadilee | Tannyaaye paree jhaalee | Naadaleese sarvasve ||

Ovee 10

किंवा बाण ढाळितां खेळींमेळीं । निधान लावला हस्तकमळीं । तो गार म्हणोनि सांडिला जळीं । महाडोहीं निर्दैवे ॥ १० ॥

Transliteration

Kivaa baana dhaalitaa kheleem-melee | Nidhaana laavalaa hasta-kamalee | Toh gaara mhanoni saandilaa jalee | Mahaadohee nirdaive ||

Ovee 11

कीं सहज आतुडे हातीं परिस । खापर म्हणोनि टाकितसे त्यास । कीं घरा आला राजहंस । वायस म्हणोनि दवडिला ॥ ११ ॥

Transliteration

Kee sahaja aatude haatee parisu | Khaapara mhanoni taakitase tyaasu | Kee gharaa aalaa raajahansu | Vaayasa mhanoni davadilaa ||

Ovee 12

कीं हार देऊं देव उदित । परी त्यासी भासलें परम भूत । तन्न्यायें विप्रकांतेस । घडोनि आलें महाराजा ॥ १२ ॥

Transliteration

Kee haara deoo deva uditu | Paree tyaasee bhaasale parama bhootu | Tannyaaye vipra kaantesu | Ghadoni aale Mahaaraajaa ||

Ovee 13

येरीकडे मच्छिंद्रनाथ । पूर्वसमुद्रीं जगन्नाथ । करोनि सेतुबंधा येत । रामेश्वरदर्शनीं ॥ १३ ॥

Transliteration

Yereekade Machchindra Naathu | Poorva samudree Jagannaathu | Karoni Setu-bandhaa yetu | Raameshvara darshanee ||

Ovee 14

तो श्वेतीं येऊनि करी स्नान । अवचट देखिला वायुनंदन । क्लेशशरीरा जरा व्यापून । सान शरीरीं बैसला ॥ १४ ॥

Transliteration

Toh Shvetee yeuuni karee snaanu | Avachata dekhilaa Vaayu-Nandanu | Klesha shareeraa jaraa vyaapuunu | Saana shareeree baisalaa ||

Ovee 15

तया संधींत मेघ वर्षाव । करिता झाला सहजस्वभाव । दरडी उरकोनि गुहा यास्तव । करिता झाला मारुती ॥ १५ ॥

Transliteration

Tayaa sandheenta megha varshaavu | Karitaa jhaalaa sahaja svabhaavu | Daradee urakoni guhaa yaastavu | Karitaa jhaalaa Maarutee ||

Ovee 16

वरुनि वर्षाव पर्जन्य करीत । येरु इकडे दरडी उकरीत । तें पाहोनि मच्छिंद्रनाथ । विस्मयातें पावले ॥ १६ ॥

Transliteration

Varuni varshaava parjanya kareetu | Yeru ikade daradee ukareetu | Tey paahoni Machchindra Naathu | Vismayaate paavale ||

Ovee 17

पावला परी हटकोनि बोलत । म्हणे मर्कटा तूं मूर्ख बहुत । आतां करिसी सदन निश्चित । स्वशरीर रक्षावया ॥ १७ ॥

Transliteration

Paavalaa paree hatakoni bolatu | Mhane markataa too moorkha bahutu | Aataa karisee sadana nishchitu | Sva shareera rakshaavayaa ||

Ovee 18

पर्जन्य वर्षे विशाळधार । यांत कधीं करसील घर । जैंसे तस्करीं लुटलियावर । दीपा तेल भरीतसे ॥ १८ ॥

Transliteration

Parjanya varshe vishaala-dhaaru | Yaanta kadhee karaseela gharu | Jainse taskaree lutaliyaa varu | Deepaa tela bhareetase ||

Ovee 19

कीं बाईल गेलिया झोपा केला । तैसा न्याय घडोनि आला । कीं स्वसदनातें पावक लागला । कूप खणी विझवावया ॥ १९ ॥

Transliteration

Kee baaeela geliyaa jhopaa kelaa | Taisaa nyaaya ghadoni aalaa | Kee sva sadanaate paavaka laagalaa | Koopa khanee vijhavaavayaa ||

Ovee 20

कीं ग्रीवे पडतां काळफांस । मग वाचिता होय अमरस्तोत्रास । कीं परम पीडितां तृषार्तास । कूप खणूं म्हणतसे ॥ २० ॥

Transliteration

Kee greeve padataa kaala phaansu | Maga vaachitaa hoya amara-stotraasu | Kee parama peeditaa trishaa aartaasu | Koopa khanoo mhanatase ||

Ovee 21

कीं हृदयीं पेटला जठरानळ । कामधेनूतें इच्छिती फळ । किंवा मेघ ओसरल्या बीजें रसाळ । महीलागीं पेरीतसे ॥ २१ ॥

Transliteration

Kee hridayee petalaa jatharaa-analu | Kaamadhenoote ichchitee phalu | Kivaa megha osaralyaa beeje rasaalu | Mahee laagee pereetase ||

Ovee 22

तन्न्यायें पर्जन्यकाळ । सदन करिसी उतावीळ । तस्मात् मूर्ख मर्कट वाचाळ । मिरवूं आलासी पुढारां ॥ २२ ॥

Transliteration

Tannyaaye parjanya kaalu | Sadana karisee utaaveelu | Tasmaatu moorkha markata vaachaalu | Miravoo aalaasee pudhaaraa ||

Ovee 23

ऐसें ऐकोनि वायुनंदन । म्हणे चतुर आहेस कोण । येरु म्हणे जती पूर्ण । मच्छिंद्र ऐसें मज म्हणती ॥ २३ ॥

Transliteration

Aise aikoni Vaayu-Nandanu | Mhane chatura aahesa konu | Yeru mhane jatee poornu | Machchindra aise maja mhanatee ||

Ovee 24

येरु म्हणे तूतें जती । कोणे अर्थी लोक म्हणती । नाथ म्हणे प्रतापशक्ती । आहे म्हणोनि वदतात ॥ २४ ॥

Transliteration

Yeru mhane toote jatee | Kone arthee loka mhanatee | Naatha mhane prataapa shaktee | Aahe mhanoni vadataata ||

Ovee 25

यावरी बोले वायुसुत । आम्ही आयिकतों जती हनुमंत । तुम्ही नूतन जती महींत । एकाएकीं उदेलां ॥ २५ ॥

Transliteration

Yaavaree bole Vaayusutu | Aamhee aayikato jatee Hanumantu | Tumhee nootana jatee maheentu | Ekaaekee udelaa ||

Ovee 26

तरीं आतां असो कैसें । मी मारुतीच्या शेजारास । भावें राहोनि एक वेळेस । वरिलें आहे महाराजा ॥ २६ ॥

Transliteration

Taree aataa aso kaise | Mee Maarutee-chyaa shejaaraasu | Bhaave raahoni eka velesu | Varile aahe Mahaaraajaa ||

Ovee 27

तेही कला सहस्त्रांशीं । मातें लाधली महापरेशी । ते तुज दावितों या समयासी । तयापासाव जे प्राप्त झाली ॥ २७ ॥

Transliteration

Tehee kalaa sahastraanshee | Maate laadhalee mahaa pareshee | Tey tuja daavito yaa sama yaasee | Tayaa paasaava je praapta jhaalee ||

Ovee 28

तरी त्या कळेचें निवारण । करोनि दावीं मजकारण । नातरी जती ऐसें नाम । सोडोनियां जाई कां ॥ २८ ॥

Transliteration

Taree tyaa kaleche nivaaranu | Karoni daavee majakaaranu | Naataree jatee aise naamu | Sodoniyaa jaaee kaa ||

Ovee 29

यावरी बोले मच्छिंद्रनाथ । कोणती कळा ती दावीं मातें । तिचें निवारण श्रीगुरुनाथ । करी जाण निश्चयें ॥ २९ ॥

Transliteration

Yaavaree bole Machchindra Naathu | Konatee kalaa tee daavee maate | Tiche nivaarana Shreeguru Naathu | Karee jaana nishchaye ||

Ovee 30

जैसा श्रीराम असतां शयनीं । पाहे मारुती वृक्षावरोनी । नाना पर्वत टाकी उचलोनी । रामशरीरा योजोनियां ॥ ३० ॥

Transliteration

Jaisaa Shree Raama asataa shayanee | Paahe Maarutee vrikshaa varonee | Naanaa parvata taakee uchalonee | Raama shareeraa yojoniyaa ||

Ovee 31

परी रामें न सोडितां शयन । सज्ज करुनि चापबाण । सकळ पर्वतांकारण । निवारण करी तो ॥ ३१ ॥

Transliteration

Paree Raame na soditaa shayanu | Sajja karuni chaapabaanu | Sakala parvataan kaaranu | Nivaarana karee toh ||

Ovee 32

तन्न्यायें श्रीगुरुराज । सकळ अर्थी पुरवील चोज । सकळ ब्रह्मांडांचे ओझे । नखाग्रीं धरील तो ॥ ३२ ॥

Transliteration

Tannyaaye Shreeguru Raaju | Sakala arthee puraveela choju | Sakala brahmaandaanche ojhe | Nakhaagree dhareela toh ||

Ovee 33

तेथें तुझी मर्कट कथा । किती असे दावी आतां । फार करिसील पाषंडता । झोकसील कवळीनें ॥ ३३ ॥

Transliteration

Tethe tujhee markata kathaa | Kitee ase daavee aataa | Phaara kariseela paashandataa | Jhokaseela kavaleene ||

Ovee 34
तरी आतां कां करिसी उशीर । मर्कटा दावीं चमत्कार । ऐसें ऐकतां वायुकुमर । पूर्ण चित्तीं क्षोभला ॥ ३४ ॥

Transliteration
Taree aataa kaa karisee usheeru | Markataa daavee chamatkaaru | Aise aikataa Vaayukumaru | Poorna chittee kshobhalaa ||

Ovee 35
उड्डाण करोनि जाय एकांता । तेथें धरी भीमरुपता । न कळतां त्यातें सात पर्वतां । उचलोनिया फेकिले ॥ ३५ ॥

Transliteration
Uddaana karoni jaaya ekaantaa | Tethe dharee bheema rupataa | Na kalataa tyaate saata parvataa | Uchaloniyaa phekile ||

Ovee 36
नभमंडपी ढगासमान । पर्वत येतसे पंथी गगन । तें मच्छिंद्रनाथें दृष्टी पाहोन । स्थिर स्थिर म्हणतसे ॥ ३६ ॥

Transliteration
Nabha-mandapee dhagaa samaanu | Parvata yetase panthee gaganu | Tey Machchindra Naathe drishtee paahonu | Sthira sthira mhanatase ||

Ovee 37
वातप्रेरक मंत्रशक्ति । वाटेंत कोंदली पर्वतीं । तो येरीकडे आणिक मारुती । दुसरा पर्वत फेकितसे ॥ ३७ ॥

Transliteration
Vaata preraka mantra shakti | Vaatenta kondalee parvatee | Toh yereekade aanika Maarutee | Dusaraa parvata phekitase ||

Ovee 38
तो दुसरा म्हणतां तिसरा येत । चवथा पांचवा शतानुशत । मग एकचि मंत्रे करोनि वात । ठायींचे ठायीं रोधिला ॥ ३८ ॥

Transliteration
Toh dusaraa mhanataa tisaraa yetu | Chavathaa paanchavaa shataanu shatu | Maga ekachi mantre karoni vaatu | Thaayeenche thaayee rodhilaa ||

Ovee 39
जैसे कंदुक बाळ खेळती । मध्यें अटकतां परते पंथी । तन्न्याय झाला पर्वतीं । ठायींच्या ठायीं जाती ते ॥ ३९ ॥

Transliteration
Jaise kanduka baala khelatee | Madhye atakataa parate panthee | Tannyaaya jhaalaa parvatee | Thaayeenchyaa thaayee jaatee tey ||

Ovee 40

येरीकडे वायुनंदन । पर्वत परतता दृष्टी पाहोन । पूर्ण क्षोभला जेवीं कृशान । महाप्रळयकाळींचा ॥ ४० ॥

Transliteration

Yereekade Vaayu-Nandanu | Parvata paratataa drishtee paahonu | Poorna kshobhalaa jevee krishaanu | Mahaa pralaya kaaleenchaa ||

Ovee 41

मग महापर्वत एक विस्तीर्ण । उचलोनि बाहुमस्तकीं अर्पून । फेकावां तो मच्छिंद्रनाथानें । निजदृष्टीने देखिला ॥ ४१ ॥

Transliteration

Maga mahaa parvata eka visteernu | Uchaloni baahu-mastakee arpuunu | Phekaavaa toh Machchindra Naathaane | Nijadrishteene dekhilaa ||

Ovee 42

मग अब्धिउदक घेऊनि । वायुआकर्षणमंत्र म्हणोनी । सबळ झुगारोनि पाणी । वायुनंदन सिंचिला ॥ ४२ ॥

Transliteration

Maga abdhi udaka gheuuni | Vaayu aakarshana mantra mhanonee | Sabala jhugaaroni paanee | Vaayu Nandana sinchilaa ||

Ovee 43

तेणें भरोनि शरीरीं वात । चलनवलन सर्व सांडीत । ऊर्ध्व झाले दोन्ही हात । मौळीं पर्वत राहिला ॥ ४३ ॥

Transliteration

Tene bharoni shareeree vaatu | Chalana valana sarva saandeetu | Oordhva jhaale donhee haatu | Maulee parvata raahilaa ||

Ovee 44

मग ते जैसी स्तंभावरी । रचिली म्हणती द्वारकापुरी । तेवी मारुती शिरावरी । पर्वतातें मिरवीतसे ॥ ४४ ॥

Transliteration

Maga tey jaisee stambhaa varee | Rachilee mhanatee Dvaarakaa-puree | Tevee Maarutee shiraavaree | Parvataate miraveetase ||

Ovee 45

खाली टाकावया न चले बळ । जेवीं विरला हस्त विकळ । पदीं चालावयाही बळ । कांही एक न चाले ॥ ४५ ॥

Transliteration

Khaalee taakaavayaa na chale balu | Jevee viralaa hasta vikalu | Padee chaalaavayaa hee balu | Kaanhee eka na chaale ||

Ovee 46

तें पाहोनियां दीन बाळ । हृदयीं कवळी तात अनिळ । मग प्रत्यक्ष होऊनि रसाळ । सोडीं सोडीं बाळातें ॥ ४६ ॥

Transliteration

Tey paahoniyaa deena baalu | Hridayee kavalee taata Anilu | Maga pratyaksha houuni rasaalu | Sodee sodee baalaate ||

Ovee 47

तैं अवश्य म्हणोनि मच्छिंद्रनाथ । पुन्हा प्रेरिला मंत्रवात । मग मौळींचा उतरोनि पर्वत । ठायींचे ठायीं ठेवीतसे ॥ ४७ ॥

Transliteration

Tai avashya mhanoni Machchindra Naathu |Purathaa (Punhaa) prerilaa mantra vaatu | Maga mauleenchaa utaroni parvatu | Thaayeenche thaayee theveetase ||

Ovee 48

मग चलनवलन वातशक्ती । संगीत झाली देहस्थिती । मग समीप येऊनि नाथाप्रती । धन्य धन्य म्हणतसे ॥ ४८ ॥

Transliteration

Maga chalana valana vaata shaktee | Sangeeta jhaalee deha sthitee | Maga sameepa yeuuni Naathaa pratee | Dhanya dhanya mhanatase ||

Ovee 49

यावरी बोलता झाला अनिळ । बा मारुती तुझे न चले बळ । तुज मज अतिनिर्बळ । बांधोनि केलें सिद्धानें ॥ ४९ ॥

Transliteration

Yaavaree bolataa jhaalaa Anilu | Baa Maarutee tujhe na chale balu | Tuja maja ati-nirbalu | Baandhoni kele siddhaane ||

Ovee 50

जेणें तुझिया बापा बांधिलें । त्यासी तुझें भय काय आलें । त्याचें आचरण तैसें झालें । भक्तिशक्ति अघटित ॥ ५० ॥

Transliteration

Jene tujhiyaa baapaa baandhile | Tyaasee tujhe bhaya kaaya aale | Tyaache aacharana taise jhaale | Bhakti shakti aghatita ||

Ovee 51

म्हणसी सिद्धाची मंत्रस्थिती । अघटित असे वदतां उक्ती । तरी माझी भक्ति गुरुची शक्ती । ईश्वरी वाचा म्हणतात ॥ ५१ ॥

Transliteration

Mhanasee siddha achee mantra sthitee | Aghatita ase vadataa uktee | Taree maajhee bhakti guruchee shaktee | Eashvaree vaachaa mhanataatu ||

Ovee 52

येतुल्या पांच शक्ती क्रियावंतासि । सकळ देवता होती दासी । ऐसें ऐकोनि अंजनीसुतासी । परम आनंद मिरवला ॥ ५२ ॥

Transliteration

Yetulyaa paancha shaktee kriyaa vantaasi | Sakala devataa hotee daasee | Aise aikoni Anjanee-sutaasee | Parama aananda miravalaa ||

Ovee 53

याउपरांतिक मच्छिंद्रनाथ । मारुत मारुती यांच्या चरणीं लागत । म्हणे येथोनि तुमचें सख्य उचित । मजवरती असो कां ॥ ५३ ॥

Transliteration

Yaa uparaantika Machchindra Naathu | Maaruta Maarutee yaanchyaa charanee laagatu | Mhane yethoni tumache sakhya uchitu | Maja varatee aso kaa ||

Ovee 54

मग प्रसन्न चित्तीं समीर मारुती । म्हणती बारे सत्कार्यार्थी । आम्ही वेंचोनि आपुली शक्ती । सुखसंपत्ती तुज देऊं ॥ ५४ ॥

Transliteration

Maga prasanna chittee Sameera Maarutee | Mhanatee baare sat kaarya arthee | Aamhee venchoni aapulee shaktee | Sukha sampattee tuja deoo ||

Ovee 55

जैसे दानवांच्या काजा । कविमहाराज उशना वर्ते वोजा । तेवीं त्वत्कार्यार्थ भोजा । शक्ती आपुली वेचूं आम्ही ॥ ५५ ॥

Transliteration

Jaise daanavaanchyaa kaajaa | Kavi Mahaaraaja Ushanaa varte vojaa | Tevee tvat kaaryaartha bhojaa | Shaktee aapulee vechoo aamhee ||

Ovee 56

कीं सागरीं टिटवी अंड्यांकरिता । आपुल्या शक्ती झाल्या वेंचिता । तेवीं महाराजा त्वत्कार्यार्था । शक्ती आपुली वेचूं की ॥ ५६ ॥

Transliteration

Kee saagaree titavee andyaan karitaa | Aapulyaa shaktee jhaalyaa venchitaa | Tevee Mahaaraajaa tvat kaaryaarthaa | Shaktee aapulee vechoo kee ||

Ovee 57

कीं विधीच्या संकटांत । विष्णु मत्स्यावतार घेत । तन्न्यायें त्वत्कार्यार्थ । शक्ती आपुली वेचूं कीं ॥ ५७ ॥

Transliteration

Kee Vidhee chyaa sankataantu | Vishnu matsya avataara ghetu | Tannyaaye tvat kaaryaarthu | Shaktee aapulee vechoo kee ||

Ovee 58

की अवश्य ऋषीचे शापपृष्ठीं । स्वयें विष्णु झाला कष्टी । तन्न्यायें तुजसाठी । शक्ती आपुली वेचूं कीं ॥ ५८ ॥

Transliteration

Kee avashya risheeche shaapa prishthee | Svaye Vishnu jhaalaa kashtee | Tannyaaye tuja saathee | Shaktee aapulee vechoo kee ||

Ovee 59

कीं रामाच्या उपयोगासी । कपि गेले सीताशुद्धीसी । तन्न्यायें तुजसी । शक्ती आपुली वेचूं कीं ॥ ५९ ॥

Transliteration

Kee Raamaa chyaa upayogaasee | Kapi gele Seetaa shuddheesee | Tannyaaye tujasee | Shaktee aapulee vechoo kee ||

Ovee 60

ऐसें वरदवाग्रत्न । ओपूनि प्रीतीं वायुनंदन । म्हणतो बा रे तीर्थागमन । जती नाम मिरवी कां ॥ ६० ॥

Transliteration

Aise varada vaag ratnu | Opuuni preetee Vaayu-Nandanu | Mhanatee baa re teerth aagamanu | Jatee naama miravee kaa ||

Ovee 61

यावरी बोले मच्छिंद्रनाथ । जती नामें होईन विख्यात । परी एक कल्पना उदेली चित्तांत । त्या भ्रांतीते निवटीं कां ॥ ६१ ॥

Transliteration

Yaavaree bole Machchindra Naathu | Jatee naame hoeena vikhyaatu | Paree eka kalpanaa udelee chittaantu | Tyaa bhraanteete nivatee kaa ||

Ovee 62

येरु म्हणे कल्पना कोणती । उदेली कामना तुझे चित्तीं । नाथ म्हणे तूं सर्वज्ञमूर्ती । आयुष्यभविष्य जाणसी ॥ ६२ ॥

Transliteration

Yeru mhane kalpanaa konatee | Udelee kaamanaa tujhe chittee | Naatha mhane too sarvajnya moortee | Aayushya bhavishya jaanasee ||

Ovee 63

ऐसी सर्वज्ञा असोनि नीती । विवाद केला कां मजप्रती । आणि भेटी झाली नागाश्वत्थीं । तुझी माझी पूर्वींच ॥ ६३ ॥

Transliteration

Aisee sarvajnyaa asoni neetee | Vivaada kelaa kaa majapratee | Aani bhetee jhaalee Naaga Ashvatthee | Tujhee maajhee poorveencha ||

Ovee 64

तें शाबरी विद्येचें कवित्व । करवोनि वर दिधला त्यांत । ऐसें असोनि सखया माहीत । रळी व्यर्थ कां केली ॥ ६४ ॥

Transliteration

Tey Shaabaree-vidyeche kavitvu | Karavoni vara didhalaa tyaantu | Aise asoni sakhayaa maaheetu | Ralee vyartha kaa kelee ||

Ovee 65

यावरी बोले वायुनंदन । बा तूं करितां श्वेतीं स्नान । तेव्हां तूतें ओळखोन । तुजपासीं मी आलो ॥ ६५ ॥

Transliteration

Yaavaree bole Vaayu Nandanu | Baa too karitaa Shvetee snaanu | Tevhaa toote olakhonu | Tujapaasee mee aalo ||

Ovee 66

तूं कवि नारायणाचा अवतार । जननीं भेदिलें मच्छोदर । हे माहीत परी कल्पनेवर । चित्त कांहीं उदेलें ॥ ६६ ॥

Transliteration

Too Kavi Naaraayana achaa avataaru | Jananee bhedile machchodaru | Hey maaheeta paree kalpanevaru | Chitta kaanhee udele ||

Ovee 67

कीं नागपत्रीं अश्वत्थासीं । वर ओपिला देवें तुजपासीं । परी त्या सद्विद्येचे सामर्थ्यासी । पाहूं ऐसें वाटलें ॥ ६७ ॥

Transliteration

Kee Naagapatree Ashvatthaasee | Vara opilaa deve tujapaasee | Paree tyaa sad vidyeche saamarthyaasee | Paahoo aise vaatale ||

Ovee 68

यावरी पुढें कार्य आणिक । पडलें तूतें अलोलिक । तेथें टिकाव धरणें कौतुक । म्हणोनि शोध शोधिला ॥ ६८ ॥

Transliteration

Yaavaree pudhe kaarya aaniku | Padale toote aloliku | Tethe tikaava dharane kautuku | Mhanoni shodha shodhilaa ||

Ovee 69

तरी बा आतां येथोनि गमन । स्त्रीराज्यासी करावें मज लक्षोन । तेथें नातळे पुरुषप्रवेश पूर्ण । परत्रभुवनीं तो पावे ॥ ६९ ॥

Transliteration

Taree baa aataa yethoni gamanu | Stree-Raajyaasee karaave maja lakshonu | Tethe naatale purusha pravesha poornu | Paratra bhuvanee toh paave ||

Ovee 70

बा रे झालें तुझे दर्शन । तुजसीं आहे माझें कारण । मज मस्तकीचें ओझे उतरणें । तुझे हातें होईल ॥ ७० ॥

Transliteration

Baa re jhaale tujhe darshanu | Tujasee aahe maajhe kaaranu | Maja masta kee che ojhe utarane | Tujhe haate hoeela ||

Ovee 71

यावरी बोले मच्छिंद्रनाथ । कैसा झालासी ऋणी व्यक्त । सर्व कामातें वायुसुत । सांगोपांग निरोपी ॥ ७१ ॥

Transliteration

Yaavaree bole Machchindra Naathu | Kaisaa jhaalaasee rinee vyaktu | Sarva kaamaate Vaayusutu | Saanga upaanga niropee ||

Ovee 72

येरु म्हणे योगद्रुमा । रामाचें घडलें दास्य आम्हां । सिताशुद्धि पाहोनि उगमा । लंकापति मारविला ॥ ७२ ॥

Transliteration

Yeru mhane yogadrumaa | Raamaache ghadale daasya aamhaa | Seetaa shuddhi paahoni ugamaa | Lankaa-pati maaravilaa ||

Ovee 73

तैं सीता घेऊनि अयोध्ये जातां । परी सीतेच्या कामना वेधली चित्ता । आहे दासत्व मारुती करिता । महीलागी हा एक ॥ ७३ ॥

Transliteration

Tai Seetaa gheuuni Ayodhye jaataa | Paree Seetechyaa kaamanaa vedhalee chittaa | Aahe daasatva Maarutee karitaa | Mahee laagee haa eka ||

Ovee 74

तरी हा असो बा संपूर्ण संपन्न । कांता धन सुत एक सदन । जरी वितुळे सुख संसारीं साधन । कांतेमागें होतसे ॥ ७४ ॥

Transliteration

Taree haa aso baa sampoorna sampannu | Kaantaa dhana suta eka sadanu | Jaree vitule sukha sansaaree saadhanu | Kaantemaage hotase ||

Ovee 75

तरी या मारुतीसी कांता करोन । भोगवूं सर्वसुखसंपन्न । परी ब्रह्मचारी मम भाषण । मान्य करील कीं नाहीं ॥ ७५ ॥

Transliteration

Taree yaa Maaruteesee kaantaa karonu | Bhogavoo sarva sukha sampannu | Paree brahmachaaree mama bhaashanu | Maanya kareela kee naahee ||

Ovee 76

तरी यातें वचनीं गोंवून । गृहस्थाश्रमी करावा वायुनंदन । ऐसें सीतेनें कल्पोन । पाचारिलें आम्हांते ॥ ७६ ॥

Transliteration

Taree yaate vachanee govuunu | Grihastha aashramee karaavaa Vaayu-Nandanu | Aise Seetene kalponu | Paachaarile aamhaante ||

Ovee 77

जवळीं बैसवोनि स्नेहानें । स्वकरें मग मुख कुर्वाळोन । म्हणे बा मारुति तूं धन्य । तिहीं लोकीं अससी पै ॥ ७७ ॥

Transliteration

Javalee baisavoni snehaane | Svakare maga mukha kurvaalonu | Mhane baa Maaruti too dhanyu | Tihee lokee asasee pai ||

Ovee 78

तरी बा माझें एक मागणें । देसील तरी उत्तम मानीन । यावरी तूंही नकार मजलागोन । देणार नाहीं सहसाही ॥ ७८ ॥

Transliteration

Taree baa maajhe eka maagane | Deseela taree uttama maaneenu | Yaavaree toonhee nakaara majalaagonu | Denaara naahee sahasaahee ||

Ovee 79

उदार वेंचिती आपुला प्राण । परी नकार न देती वाचेकरोन । शिबीरायानें कपोताकारणें । मांस दिधलें रती रती ॥ ७९ ॥

Transliteration

Udaara venchitee aapulaa praanu | Paree nakaara na detee vaache karonu | Shibee raayaane kapotaa kaarane | Maansa didhale ratee ratee ||

Ovee 80

पाहें श्रियाळ उदारकीर्ती । बाळ दिधलें याचकाहातीं । तन्न्यायें त्याच पंक्तीं । तूंही अससी कपींद्रा ॥ ८० ॥

Transliteration

Paahe Shriyaala udaara keertee | Baala didhale yaachakaa haatee | Tannyaaye tyaacha panktee | Toonhee asasee kapeendraa ||

Ovee 81

ऐसे ऐकतां जननीवचन । परम तोषला वायुनंदन । म्हणे माय वो कामना कोण । उदित करीं देऊन मी ॥ ८१ ॥

Transliteration

Aise aikataa jananee vachanu | Parama toshalaa Vaayu-Nandanu | Mhane Maaya vo kaamanaa konu | Udita karee deuuna mee ||

Ovee 82

येरी म्हणे करतलभाष । देसी आपुल्या सद्भावास । तरी मम कामनेची हौस । दृश्य करीन तुज बा रे ॥ ८२ ॥

Transliteration

Yeree mhane karatala bhaashu | Desee aapulyaa sat bhaavaasu | Taree mama kaamanechee hausu | Drishya kareena tuja baa re ||

Ovee 83

मग करीं कर वोपोनि शेवटीं । म्हणे मागाल ते कामना होटीं । ते मी देऊनि चित्तसंतुष्टी । मिरवीन जननीये ॥ ८३ ॥

Transliteration

Maga karee kara voponi shevatee | Mhane maagaala tey kaamanaa hotee | Tey mee deuuni chitta santushtee | Miraveena jananeeye ||

Ovee 84

येरी म्हणे मम कामना । तुवां आचरावें गृहस्थाश्रमा । कांता करोनि संसारउगमा । सर्व सुख भोगावें ॥ ८४ ॥

Transliteration

Yeree mhane mama kaamanaa | Tuvaa aacharaave grihastha aashramaa | Kaantaa karoni samsaara ugamaa | Sarva sukha bhogaave ||

Ovee 85

ऐसी ऐकतां वाग्वटी । सप्रेम खोंचला आपुल्या पोटीं । म्लानवदन चित्त हिंपुटी । परम संकटीं पडियेला ॥ ८५ ॥

Transliteration

Aisee aikataa vaagvatee | Saprema khonchalaa aapulyaa potee | Mlaana vadana chitta himputee | Parama sankatee padiyelaa ||

Ovee 86

मग न देतां मातेसी कांहीं उत्तर । येऊनि बैसला रामासमोर । परी चित्तवृत्ति कोमीत मुखचंद्र । श्रीरघूत्तमें पाहिला ॥ ८६ ॥

Transliteration

Maga na detaa maatesee kaanhee uttaru | Yeuuni baisalaa Raamaa samoru | Paree chitta vritti komeeta mukha chandru | Shree Raghu uttame paahilaa ||

Ovee 87

मग जवळी पाचारोनि हृदयीं । धरीत आली दयाळ आई । म्हणे बा रे तुझा व्यर्थ केवीं । मुखचंद्र वाळला ॥ ८७ ॥

Transliteration

Maga javalee paachaaroni hridayee | Dhareeta aalee dayaala aaee | Mhane baa re tujhaa vyartha kevee | Mukha chandra vaalalaa ||

Ovee 88

मग प्रांजळीं सर्व कथन । श्रीरामातें निवेदून । नेत्रीं अश्रू म्लान वदन । मी करोनियां बसलो ॥ ८८ ॥

Transliteration

Maga praanjalee sarva kathanu | Shree Raamaate niveduunu | Netree ashroo mlaana vadanu | Mee karoniyaa basalo ||

Ovee 89

परी अंत:साक्ष रघुकुळटिळक । म्हणे वायां न मानीं दु:ख । स्त्रीराज्याच्या स्त्रिया सकळिक । कांता असती तुझ्याचि ॥ ८९ ॥

Transliteration

Paree anta saaksha Raghu-kula-tilaku | Mhane vaayaa na maanee dukhu | Stree raajyaachyaa striyaa sakaliku | Kaantaa asatee tujhyaachi ||

Ovee 90

तरी बा याचें ऐक कथन । कृत त्रेत द्वापार कलि पूर्ण । या चोहों युगांतें म्हणती निपुण । चौकडी एक ही असे ॥ ९० ॥

Transliteration

Taree baa yaache aika kathanu | Krita Treta Dvaapaara Kali poornu | Yaa choho yugaante mhanatee nipunu | Chaukadee eka hee ase ||

Ovee 91

तरी बा ऐशा चौकड्या किती । तीनशे शहाण्णव बोलती मिती । तूतें मातें चोहों चौकड्यांप्रती । जन्मा येणें आहेचि ॥ ९१ ॥

Transliteration

Taree baa aishaa chaukadyaa kitee | Teenashe shahaannava bolatee mitee | Toote maate choho chaukadyaam pratee | Janmaa yene aahechi ||

Ovee 92

मी नव्याण्णवावा राम क्षितीं । तूंही नव्याण्णवावा मारुती । आणि लंकाधीश याच नीतीं । नव्याण्णवावा असे तो ॥ ९२ ॥

Transliteration

Mee navyaan navaavaa Raama kshitee | Toonhee navyaan navaavaa Maarutee | Aani Lankaa adheesha yaacha neetee | Navyaan navaavaa ase tee ||

Ovee 93

यावरी चौदा चौकड्यांचे राज्य रावण । करील ऐसें बोलती वचन । परी चौदा अंकींचा आकडा मागोन । आंख नेला विधीनें तो ॥ ९३ ॥

Transliteration

Yaavaree chaudaa chaukadyaanche raajya Raavanu | Kareela aise bolatee vachanu | Paree chaudaa ankeenchaa aakadaa maagonu | Aankha nelaa Vidheene toh ||

Ovee 94

मग उरला वरील एक चतुर्थ । तितुक्या चौकड्या राज्य करीत । परी सांगावया कारण त्यांत । आपण मारोनि येतसे ॥ ९४ ॥

Transliteration

Maga uralaa vareela eka chaturthu | Titukyaa chaukadyaa raajya kareetu | Paree saangaavayaa kaarana tyaantu | Aapana maaroni yetase ||

Ovee 95

मग आल्यावरी स्त्रीराज्यांत । जाणे लागे मारुती तूतें । तरी बा पाळी तुझी निश्चित । आली आहे ती भोगीं कां ॥ ९५ ॥

Transliteration

Maga aalyaavaree stree raajyaantu | Jaane laage Maarutee toote | Taree baa paalee tujhee nishchitu | Aalee aahe tee bhogee kaa ||

Ovee 96

ऐसें म्हणतां श्रीराम वहिला । मग म्यां त्यांतें प्रश्न केला । की दृढ कासोटी आहे मजला । भेटी केवीं कामरती ॥ ९६ ॥

Transliteration

Aise mhanataa Shree Raama vahilaa | Maga myaa tyaante prashna kelaa | Kee dridha kaasotee aahe majalaa | Bhetee kevee kaamaratee ||

Ovee 97

मग राम म्हणे बा ऊर्ध्वरेती । आजपासोनि असे मारुती । तयाच्या भुभु:कारें श्वाससंगतीं । गरोदर होती त्या स्त्रिया ॥ ९७ ॥

Transliteration

Maga Raama mhane baa oordhva retee | Aajapaasoni ase Maarutee | Tayaa chyaa bhubhukaare shvaasa sangatee | Garodara hotee tyaa striyaa ||

Ovee 98

तरि तूं सकळ संशय सांडोन । शैल्यदेशीं करी गमन । तुझें ब्रह्मचारीपण । ढळत नाहीं महाराजा ॥ ९८ ॥

Transliteration

Tari too sakala sanshaya saandonu | Shailya deshee karee gamanu | Tujhe brahmachaaree panu | Dhalata naahee Mahaaraajaa ||

Ovee 99

ऐशी वार्ता होतां निश्चितीं । मग म्यां स्वीकारिलें शैल्यदेशाप्रति । यावरी तेथेंही स्त्रिया नृपती । मेनका नामें विराजली ॥ ९९ ॥

Transliteration

Aishee vaartaa hotaa nishchitee | Maga myaa sveekaarile Shailya-deshaa prati | Yaavaree tethenhee striyaa nripatee | Menakaa naame viraajalee ||

Ovee 100

तीतें पृथ्वीची देशवार्ता । ऐकिव झाली कीं पुरुषकांता । देशोदेशीं उभयतां । रमत आले स्वइच्छें ॥ १०० ॥

Transliteration

Teete prithvee chee desha vaartaa | Aikiva jhaalee kee purusha kaantaa | Deshodeshee ubhayataa | Ramata aale svaichche ||

Ovee 101

देवदानवमानवांसहित । पशुपक्षीनागजात । सकळ स्त्रीपुरुष उभयतां । इंद्रियसुखें सुखावती ॥ १०१ ॥

Transliteration

Deva daanava maanavaan sahitu | Pashu pakshee naaga jaatu | Sakala stree purusha ubhayataa | Indriya sukhe sukhaa vatee ||

Ovee 102

कामरती मंथनाकार । रतीसी अर्पिती कामिक नर । ऐसा जाणोनि मनीं विचार । परम चित्तीं क्षोभली ॥ १०२ ॥

Transliteration

Kaamaratee manthanaa kaaru | Rateesee arpitee Kaamika naru | Aisaa jaanoni manee vichaaru | Parama chittee kshobhala ||

Ovee 103

मग तिनें मांडिलें अनुष्ठान । मनामाजी काम वरोन । कीं प्रत्यक्ष होऊनि वायुनंदन । रतिरत्न अर्पूं त्या ॥ १०३ ॥

Transliteration

Maga tine maandile anushthaanu | Manaamaajee kaama varonu | Kee pratyaksha houuni Vaayu-Nandanu | Ratiratna arpoo tyaa ||

Ovee 104

ऐसा काम वरोनि चित्ती । बैसलीसे दृढ तपापरती । मांसा तोडोनि यज्ञकुंडीं आहुती । मम नामीं अर्पीतसे ॥ १०४ ॥

Transliteration

Aisaa kaama varoni chittee | Baisaleese dridha tapaa paratee | Maansa todoni yajnyakundee aahutee | Mama naamee arpeetase ||

Ovee 105

ऐसे लोटले द्वादशवर्ष । सकळ आटिलें शरीरमांस । मग ती पाहोनि अति कृश । प्रसन्न झालों मी तीतें ॥ १०५ ॥

Transliteration

Aise lotale dvaadasha varshu | Sakala aatile shareera maansa | Maga tee paahoni ati krishu | Prasanna jhaalo mee teete ||

Ovee 106

परि तीतें होतां माझी भेटी । पदीं मौळी घालोनि मिठी । म्हणे अर्थ जो उद्भवला पोटीं । तो सिद्ध करीं महाराजा ॥ १०६ ॥

Transliteration

Pari teete hotaa maajhee bhetee | Padee maulee ghaaloni mithee | Mhane artha jo udbhavalaa potee | Toh siddha karee Mahaaraajaa ||

Ovee 107

मग मी विचारिता झालों तीतें । कीं कवण कामनासरिता भरिते । मज सांगोनि अर्थरसातें । सुखसमुद्रा मेळवीं ॥ १०७ ॥

Transliteration

Maga mee vichaaritaa jhaalo teete | Kee kavana kaamanaa saritaa bharite | Maja saangoni artha rasaate | Sukha samudraa melavee ||

Ovee 108

ऐसें ऐकतां वचनोत्तर । म्हणे महाराजा वायुकुमर । तुझेनि स्त्रिया गर्भिणी समग्र । होऊनि मिरवती महाराजा ॥ १०८ ॥

Transliteration

Aise aikataa vachana uttaru | Mhane Mahaaraajaa Vaayukumaru | Tujhe ni striyaa garbhinee samagru | Houuni miravatee Mahaaraajaa ||

Ovee 109

तरी तूं सकळांचा प्राणेश्वर । स्मरा ओपी भुभुःकार । तरी ते नादें रतिनार । सुख पावे सकळांसी ॥ १०९ ॥

Transliteration

Taree too sakalaanchaa Praana-Eashwaru | Smaraa opee bhubhukaaru | Taree tey naade ratinaaru | Sukha paave sakalaansee ||

Ovee 110

तरी नादबुंदा सुखासना । मैथुनरतीं धरीं कामना । हे मार्ग सकळ देशकारणा । स्वर्गमृत्युपाताळीं ॥ ११० ॥

Transliteration

Taree naadabundaa sukhaasanaa | Maithuna ratee dharee kaamanaa | Hey maarga sakala desha kaaranaa | Svarga mrityu paataalee ||

Ovee 111

तरी कां कर्म आमुचेंचि ओखट । स्वप्नीं दिसेना ऐसा पाठ । तरी तूं स्वामी आमुचा अलोट । तें सुख आम्हां मिरवीं कां ॥ १११ ॥

Transliteration

Taree kaa karma aamuchenchi okhatu | Svapnee disenaa aisaa paathu | Taree too svaamee aamuchaa alotu | Tey sukha aamhaa miravee kaa ||

Ovee 112

ऐसें वदतां स्त्रिया भूषणीं । मग मी बोलिलों तिये लागोनी । कीं ऊर्ध्वरेता जन्माहूनी । दृढकासोटी विराजिलों ॥ ११२ ॥

Transliteration

Aise vadataa striyaa bhooshanee | Maga mee bolilo tiye laagonee | Kee oordhva retaa janmaa huunee | Dridha kaasotee viraajilo ||

Ovee 113

जेथें उदय झालों जठरीं अंजनी । ते उदरा दृढकौपिनी । मातें प्राप्त शुभाननी । कनककासोटी ती असे ॥ ११३ ॥

Transliteration

Jethe udaya jhaalo jatharee Anjanee | Tey udaraa dridha kaupinee | Maate praapta shubha aananee | Kanaka kaasotee tee ase ||

Ovee 114

तस्मात् दृढ इंद्रियसंपत्ती । ढाळे लागले भांडारग्रंथीं । तेणें इंद्रियव्यवहारशक्ती । जगामाजी मिरवेना ॥ ११४ ॥

Transliteration

Tasmaatu dridha indriya sampattee | Dhaale laagale bhaandaara granthee | Tene indriya vyavahaara shaktee | Jagaa maajee miravenaa ||

Ovee 115

म्हणूनि कामा उर्ध्वगमन । श्वासोक्त रतिकामद्रुम । तुम्हां स्त्रियांचा रतिआश्रम । शांत तेणे पावतसे ॥ ११५ ॥

Transliteration

Mhanuuni Kaamaa urdhva gamanu | Shvaasokta rati kaama drumu | Tumhaa striyaanchaa rati aashramu | Shaanta tene paavatase ||

Ovee 116

तरी त्वतपाच्या श्रमध्वजा । मच्छिंद्र नगरीं विराजवूं ओजा । तें चित्तदैव रतिकाजा । कामभक्तीं तुष्टेल ॥ ११६ ॥

Transliteration

Taree tvat apaachyaa shrama dhvajaa | Machchindra nagaree viraajavoo ojaa | Tey chitta daiva ratikaajaa | Kaama bhaktee tushtela ||

Ovee 117

म्हणोनि मच्छिंद्र आहे कोण । तरी तो प्रत्यक्ष कविनारायण । त्वत्तपाच्या कामीं बैसोन । फलद्रुम होईल कीं ॥ ११७ ॥

Transliteration

Mhanoni Machchindra aahe konu | Taree toh pratyaksha Kavi Naaraayanu | Tvat tapaachyaa kaamee baisonu | Phaladruma hoeela kee ||

Ovee 118

ऐसें बोलोनि तीर्थावतीं । तुष्ट केली सकाम अर्थी । तरी तूं जाऊनि मनोरथीं । तुष्ट करीं महाराजा ॥ ११८ ॥

Transliteration

Aise boloni teerthaa vatee | Tushta kelee sakaama arthee | Taree too jaauuni manorathee | Tushta karee Mahaaraajaa ||

Ovee 119

येरु म्हणे ऊर्ध्वरेता । मातें कार्य हें निरोपितां । तरी ब्रह्मचर्यत्व समूळ वृथा । आंचवले जाईल ॥ ११९ ॥

Transliteration

Yeru mhane oordhva retaa | Maate kaarya hey niropitaa | Taree brahmacharya tva samoola vrithaa | Aanchavale jaaeela ||

Ovee 120

मी तों उदास कामशक्तीं । नोहे म्हणतील नाथपंथी । जती नामीं जगविख्याती । जगामाजी मिरवलों ॥ १२० ॥

Transliteration

Mee toh udaasa kaama shaktee | Nohe mhanateela Naatha panthee | Jatee naamee jaga vikhyaatee | Jagaa maajee miravalo ||

Ovee 121

तरी ऐसी कुकर्मराहटी । मातें घडोनि येतां जेठी । मग वाग्देवतानिंदादिवटी । येऊनि जगीं मिरवेल ॥ १२१ ॥

Transliteration

Taree aisee kukarma raahatee | Maate ghadoni yetaa jethee | Maga vaag devataa nindaa divatee | Yeuuni jagee miravela ||

Ovee 122

यावरी आणिक सिद्ध जगीं । नाथपंथी आहेत योगी । तेही योगपंथ ते प्रसंगीं । विटाळ माझा करतील ॥ १२२ ॥

Transliteration

Yaavaree aanika siddha jagee | Naatha panthee aaheta yogee | Tehee yoga pantha tey prasangee | Vitaala maajhaa karateela ||

Ovee 123

एवं स्त्रीसंग अश्लाघ्य फार । अपकीर्तीचें दृढ भांडार । सर्वविनाशी मोहनास्त्र । स्वीकारावें हें वाटेना ॥ १२३ ॥

Transliteration

Evam streesanga ashlaaghya phaaru | Apakeerteeche dridha bhaandaaru | Sarva vinaashee mohanaastru | Sveekaaraave hey vaatenaa ||

Ovee 124

स्त्रियांसंगें बहु नाडले । अपकीर्ती जगीं मिरवले । आणि सर्व सुकृता आंचवले । रितें पोतें तें वाताचें ॥ १२४ ॥

Transliteration

Streeyaan sange bahu naadale | Apakeertee jagee miravale | Aani sarva sukritaa aanchavale | Rite pote tey vaataache ||

Ovee 125

पाहें अमरेंद्र झाला भग्न । चंद्र मिरवला कलंकेकरुन । समूळ राज्यविनाश रावण । स्त्रीलोभें नाडला तो ॥ १२५ ॥

Transliteration

Paahe Amarendra jhaalaa bhagnu | Chandra miravalaa kalanke karunu | Samoola raajya vinaasha Raavanu | Streelobhe naadalaa toh ||

Ovee 126

विधिसुताची ब्रह्मकासोटी । तीही क्षणमात्रें झाली सुटी । साठ पोरे निर्मूनि पोटीं । दैन्यभाजा वरियेली ॥ १२६ ॥

Transliteration

Vidhi suta achee Brahma kaasotee | Teehee kshanamaatre jhaalee sutee | Saatha pore nirmuuni potee | Dainya bhaajaa variyelee ||

Ovee 127

याचि नीती तदा तात । अकर्मप्रवाही कन्ये रत । विधि ऐसे नाम उचित । अविधिपणें बुडविलें ॥ १२७ ॥

Transliteration

Yaachi neetee tadaa taatu | Akarma pravaahee kanye ratu | Vidhi aise naama uchitu | Avidhipane budavile ||

Ovee 128

पहा तपी तो त्र्यंबक । तपियांमाजी असे अर्क । परी कामदरीं अस्तोदक । भिल्लिणीउदधीं लुब्धला ॥ १२८ ॥

Transliteration

Pahaa tapee toh Tryambaku | Tapiyaam maajee ase Arku | Paree kaamadaree astodaku | Bhillinee udadhee lubdhalaa ||

Ovee 129

तन्न्याय तपोजेठी । काम रंभेच्या करोनि पोटीं । आंचवोनि तप घे नरोटी । तन्न्यायचि मिरवतसे ॥ १२९ ॥

Transliteration

Tannyaaya tapojethee | Kaama Rambhechyaa karoni potee | Aanchavoni tapa ghe narotee | Tannyaaya chi miravatase ||

Ovee 130

ऐसा विश्वामित्र तो अमित्र झाला । याची नीतीं वदसी मला । तरी वन्ही कामदरीला । व्याघ्रभया नांदविसी ॥ १३० ॥

Transliteration

Aisaa Vishvaamitra toh amitra jhaalaa | Yaachee neetee vadasee malaa | Taree vanhee kaama dareelaa | Vyaaghra bhayaa naandavisee ||

Ovee 131

ऐसें ऐकोनि मच्छिंद्रवचन । म्हणे बा रे योगद्रुमण । ही अनादि राहटी पूर्ण । भोग भोगितां निर्दोष ॥ १३१ ॥

Transliteration

Aise aikoni Machchindra vachanu | Mhane baa re yogadrumanu | Hee anaadi raahatee poornu | Bhoga bhogitaa nirdosha ||

Ovee 132

जैसें रामें मजला कथिलें । नव्याण्णव मारुती असे वदले । तन्न्यायें तुम्ही भले । नव्याण्णवावा अससी तूं ॥ १३२ ॥

Transliteration

Jaise Raame majalaa kathile | Navyaannava Maarutee ase vadale | Tannyaaye tumhee bhale | Navyaan navaavaa asasee too ||

Ovee 133

तरी अनादि राहटी । भोगिता झाला भामिनी वीस कोटी । मौनिनाथ येऊनि पोटीं कीर्तिअर्क मिरवेल ॥ १३३ ॥

Transliteration

Taree anaadi raahatee | Bhogitaa jhaalaa bhaaminee veesa kotee | Mauninaatha yeuuni potee keerti arka miravela ||

Ovee 134
तव तात जो उपरिचर वसु । तो तव उदरीं येईल वसु । कीर्ति ते महाप्रकाशु । महाप्रचंड मिरवेल ॥ १३४ ॥

Transliteration
Tava taata jo Uparichara Vasu | Toh tava udaree yeeela Vasu | Keerti tey mahaa prakaashu | Mahaaprachanda miravelu ||

Ovee 135
ऐसें सांगोनि वायुसुत । प्रसन्न केलें चित्त दैवत । मग वरप्रदानवाणी रुकारवंत । मच्छिंद्रनाथा देतसे ॥ १३५ ॥

Transliteration
Aise saangoni Vaayusutu | Prasanna kele chitta daivatu | Maga vara pradaana vaanee rukaara vantu | Machchindra-Naathaa detase ||

Ovee 136
जैसें शुक्रें अमित्रसुता । प्रसन्न होऊनि चित्तसविता । देऊनि मंत्रसंजीवनी अर्था । प्रभूलागीं मिरवला ॥ १३६ ॥

Transliteration
Jaise Shukre Amitrasutaa | Prasanna houuni chitta Savitaa | Deuuni mantra sanjeevanee arthaa | Prabhoo laagee miravalaa ||

Ovee 137
तेवीं अमित्रकळजा । राज्य स्थापिलें भक्तिकाजा । नेणूं बिभिषण शत्रु अनुजा । केला सरता चिरंजीव ॥ १३७ ॥

Transliteration
Tevee amitra kalajaa | Raajya sthaapile bhakti kaa jaa | Nenoo Bibhishana shatru anujaa | Kelaa sarataa chiranjeeva ||

Ovee 138
तन्न्यायें घातक वसु । नेणोनि कामशरा पासु । रुकार ते समयासु । अंजनीसुत पैं केला ॥ १३८ ॥

Transliteration
Tannyaaye ghaataka Vasu | Nenoni kaamasharaa paasu | Rukaara tey samayaasu | Anjaneesuta pai kelaa ||

Ovee 139
मग करोनि नमनानमन । अवश्यपणें करितां गमन । अदृश्य पाहोनि वायुनंदन । मच्छिंद्रनाथ चालिला ॥ १३९ ॥

Transliteration
Maga karoni namana anamanu | Avashya pane karitaa gamanu | Adrishya paahoni Vaayu-Nandanu | Machchindra Naatha chaalilaa ||

Ovee 140

सहज चालिला महीपाठीं । अर्थी हिंगळा द्यावी भेटी । ऐसें गमोनि तया वाटीं । येऊनियां पोचला ॥ १४० ॥

Transliteration

Sahaja chaalilaa mahee paathee | Arthee Hingalaa dyaavee bhetee | Aise gamoni tayaa vaatee | Yeuuniyaa pochalaa ||

Ovee 141

तवं ते शक्तिद्वारीं । रक्षक असती दक्षाचारी । अष्टभैरव कृतांत संगरीं । जिंकू पाहती कृतांता ॥ १४१ ॥

Transliteration

Tava tey shakti dvaaree | Rakshaka asatee dakshaachaaree | Ashta Bhairava Kritaanta sangaree | Jinkoo paahatee Kritaantaa ||

Ovee 142

आणि शतकोटी चामुंडा । शंखिनी डंखिनी प्रचंडा । त्याही तीव्र ब्रह्मांडा । ग्रासूं पाहती कृतांतपणी ॥ १४२ ॥

Transliteration

Aani shata kotee Chaamundaa | Shankhinee dankhinee prachandaa | Tyaahee teevra brahmaandaa | Graasoo paahatee Kritaanta-panee ||

Ovee 143

यावरी अर्णव बहु कर्कश । नाना पर्वत विशेष । त्यांत व्याघ्रादि सावजें रीस । येऊं येऊं म्हणताती ॥ १४३ ॥

Transliteration

Yaavaree arnava bahu karkashu | Naanaa parvata visheshu | Tyaata vyaaghraadi saavaje reesu | Yeoo yeoo mhanataatee ||

Ovee 144

म्हणे ते अर्णव सहज बोली । परी नोहे कृतांताची बैसे पाली । कीं पूर्वी दानवांनीं आणोनि ठेविली । भयें माया त्या ठायीं ॥ १४४ ॥

Transliteration

Mhane tey arnava sahaja bolee | Paree nohe Kritaantaachee baise paalee | Kee poorvee daanavaannee aanoni thevilee | Bhaye maayaa tyaa thaayee ||

Ovee 145

की तें अर्णव पाहतां सहज । तैंचि देवतांचें तेज । विरुनि जाय मोडे माज । नको नको म्हणवूनी ॥ १४५ ॥

Transliteration

Kee tey arnava paahataa sahaju | Tainchi devataanche teju | Viruni jaaya mode maaju | Nako nako mhanavuunee ||

Ovee 146

कंटकवन जाळिया संधी । भयानक सावजें अपार मांदी । पाहतांक्षणी कामनाबुद्धी । विरोनी जाय तत्काळ ॥ १४६ ॥

Transliteration

Kantakavana jaaliyaa sandhee | Bhayaanaka saavaje apaara maandee | Paahataan kshanee kaamanaa buddhee | Vironee jaaya tatkaala ||

Ovee 147

तेथें न पावे वायुनंदन । परम भयभीत मन । कृतांतपत्नीचें कानन । भक्षील म्हणोन पळतसे ॥ १४७ ॥

Transliteration

Tethe na paave vaayu nandanu | Parama bhayabheeta manu | Kritaanta patneeche kaananu | Bhaksheela mhanona palatase ||

Ovee 148

असो ऐशी वातगोष्टी । मित्र उदेल परम पाठीं । कीं येथे संचरतां रश्मिदाटी । ग्रासील मग काय करुं ॥ १४८ ॥

Transliteration

Aso aishee vaata goshtee | Mitra udela parama paathee | Kee yethe sancharataa rashmi daatee | Graaseela maga kaaya karu ||

Ovee 149

येऊनि ते परी कानन पाहतां । रश्मी संचारुं न देई सविता । असो ऐशी काननवार्ता । संकट भयाचें स्थान चित्तातें ॥ १४९ ॥

Transliteration

Yeuuni tey paree kaanana paahataa | Rashmee sanchaaru na deee Savitaa | Aso aishee kaanana vaartaa | Sankata bhayaache sthaana chittaate ||

Ovee 150

तेथे सिद्धमुनी राव । संचरेल आपुल्या प्रतापें गौरव । ती कथा रसज्ञ ज्ञानदेव । श्रीगुरु माझा वदेल ॥ १५० ॥

Transliteration

Tethe siddha munee raavu | Sancharela aapulyaa prataape gauravu | Tee kathaa rasajnya Jnyaana devu | Shreeguru maajhaa vadela kee||

Ovee 151

तरी स्मृतीं ठेवोनि हेत । प्राशन करा कथामृत । मग भवरोगाचें अपार भरितें । दुःखक्लेश नांदेना ॥ १५१ ॥

Transliteration

Taree smritee thevoni hetu | Praashana karaa kathaamritu | Maga bhava rogaache apaara bharite | Dukhaklesha naandenaa ||

Ovee 152

हा ग्रंथ केवळ चिंतामणी । हरेल चित्ताची काळजी मुळींहूनी । जैसे वृश्चिकदंशालागोनी । विष शोषी महाराजा ॥ १५२ ॥

Transliteration

Haa grantha kevala chintaa manee | Harela chitta achee kaalajee muleen huunee | Jaise vrishchika danshaa laagonee | Visha shoshee Mahaaraajaa ||

Ovee 153

तरी होऊनि सद्विवेक । सांडा कुटिलपणीं तर्क । निंदा दोष विघ्न भातुक । सेवूं नका सहसाही ॥ १५३ ॥

Transliteration

Taree houuni sadviveku | Saandaa kutilapanee tarku | Nindaa dosha vighna bhaatuku | Sevoo nakaa sahasaahee ||

Ovee 154

निंदाशक्ती परम पापिणी । अतिरंजक नीचवदनी । परी आमुची मायबहिणी । पवित्र करील आमुतें ॥ १५४ ॥

Transliteration

Nindaa shaktee parama paapinee | Atiranjaka neecha vadanee | Paree aamuchee maayaa bahinee | Pavitra kareela aamute ||

Ovee 155

जो या निंदेसी प्रतिपाळील । तो सखा अद्भुत आमचा स्नेही विपुळ । पातकमळांचे क्षालन करील । वारंवार इच्छीतसे ॥ १५५ ॥

Transliteration

Jo yaa nindesee pratipaaleelu | Toh sakhaa adbhuta aamachaa snehee vipulu | Paata kamalaanche kshaalana kareelu | Vaaramvaara ichcheetase ||

Ovee 156

धुंडीसुत नरहरिवंशीं । मालू स्नेह करी निंदकासी । बहुत आयुष्य इच्छी त्या मानवासी । उपकारी म्हणोनी ॥ १५६ ॥

Transliteration

Dhundeesuta Narahari vamshee | Maaloo sneha karee nindakaasee | Bahuta aayushya ichchee tyaa maanavaasee | Upakaaree mhanonee ||

Ovee 157

तरी असो आदर श्रोतीं । तुम्हीं न बैसावें तया पंगतीं । मालू तुम्हातें हीच विनंती । वारंवार करीतसे ॥ १५७ ॥

Transliteration

Taree aso aadara shrotee | Tumhee na baisaave tayaa pangatee | Maaloo tumhaate heecha vinantee | Vaaramvaara kareetase ||

Ovee 158

स्वस्ति श्रीभक्तिकथासार । संमत गोरक्षकाव्य किमयागार । सदा परिसोत भाविक चतुर । तृतीयोध्याय गोड हा ॥ १५८ ॥

Transliteration

Svasti Shreebhaktikathaa Saaru | Sammata Goraksha Kaavya kimayaa gaaru | Sadaa parisota bhaavika chaturu | Triteeya Adhyaaya goda haa ||

श्रीकृष्णार्पणमस्तु । श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

Shri Krishnarpanamastu | Shri Dattatreyarpanamastu

इति श्रीनवनाथभक्तिसार तृतीयाध्याय संपूर्ण ।

Iti Shri Navnath Bhaktisar Adhyaya Triteeya Sampurnah